## नि.क्र.४६ वर आदेश
## (दि.२२.११.२०१९)

वादी हिने नि.क्र.३६ यावर झालेल्या आदेशाची पूर्तता करण्याकरीता परवानगी मिळण्याकरीता सदरचा अर्ज सादर केला आहे. वादीतर्फे ॲड.श्री.एस.बी.मंदाडे यांनी असा युक्तीवाद केला की, नि.क्र.३६ प्रमाणे प्रतिवादी क्र.१ चे नांव खारीज करण्याकरीता वादी हिने अर्ज सादर केला होता व तो अर्ज दिनांक २५.०९.२०१९ रोजी निकाली काढण्यात आला. त्या अर्जावर पारीत झालेल्या आदेशान्वये वादी हिला दिनांक ०३.१०.२०१९ रोजी सदरच्या आदेशाची पूर्तता करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते. परंतु वादी ही वयस्कर असल्यामुळे व ती आजारी असल्यामुळे तिला वरील आदेशाची पूर्तता ही दिनांक ०३.१०.२०१९ रोजी करता आली नाही. वादी हिला वरील आदेशाची पूर्तता करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करुन दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी.

२) प्रतिवादी क्र.५ तर्फे ॲड.श्री.ए.एस.पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, वादी हिला नि.क्र.३६ यावर झालेल्या आदेशाची पूर्तता करण्याकरीता झालेल्या विलंबाबत तिने तिच्या अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. वादी हिने सदरच्या अर्जाला अनुसरुन तिचे शपथपत्र सादर केले नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा.

३) सदरचा दावा हा तात्पुरत्या मनाईहुकूमाच्या अर्जावरील युक्तीवादाकरीता व पुरसिस नि.क्र.२२ च्या अनुषंगाने आदेशाकरीता प्रलंबीत आहे. वादी ही वयोवृध्द असून ती आजारी असल्यामुळे तिला नि.क्र.३६ यावरील आदेशाची पूर्तता ही दिनांक ०३.१०.२०१९ रोजी करता आली नाही. वादी हिला नि.क्र.३६ च्या आदेशाची पूर्तता करण्याची परवाणगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादी हिला असे आदेशीत करण्यात येते की, तिने नि.क्र.३६ वरील आदेशाची पूर्तता ही तत्काळ करावी.

अहमदपूर.
दिनांक : २२.११.२०१९

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S.B. Harnale |
| Dictated on | : | 22.11.2019 |
| Checked on | : | 22.11.2019 |
| Signed on | : | 22.11.2019 |
| Uploaded on | : | 22.11.2019 |